**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील घनसावंगी तालूक्यातील भादली, गुंज बु. तसेच अंबड तालूक्यातील आलमगांव, साडेसावंगी वाळूघाट येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २२/१०/२०२१ रोजी सकाळी १०:३० वा. तहसिल कार्यालय घनसावंगी, ता. घनसावंगी, जि. जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

---

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील घनसावंगी तालूक्यातील भादली, गुंज बु. तसेच अंबड तालूक्यातील आलमगांव, साडेसावंगी वाळूघाट येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २२/१०/२०२१ रोजी सकाळी १०:३० वा. तहसिल कार्यालय घनसावंगी, ता. घनसावंगी, जि. जालना पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. केशव नेटके**
निवासी उप जिल्हाधिकारी
जालना : अध्यक्ष

२. **श्री. डॉ. प्रविण जोशी**
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, औरंगाबाद : सदस्य

३. **श्री. सो. म. कुरमूडे**
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना : समन्वयक

जालना जिल्हयातील घनसावंगी तालुक्यात तसेच अंबड तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळुघाटाच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी त्यांचा प्रतिनिधी म्हणून श्री. केशव नेटके, निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांची नियुक्ती करून त्यांच्या अध्यक्षतेखाली सदर सुनावणी ची प्रक्रिया पूर्ण करणे साठी सुचविले. त्या नुसार सदर सुनावणी मा. निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली दि. २२ आक्टोबर २०२१ रोजी सकाळी १०-३० वाजता तहसिल कार्यालय घनसावंगी येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, जालना यांचा, जालना जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १५/०९/२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तहसिल कार्यालय जालना येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे. सदर बाबतची जाहीर सुचना दि. १९/०९/२०२१ रोजीच्यो दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना येथे लिखीत स्वरूपात पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
- जिल्हा उदयोग केंद्र, जालना.
- जिल्हा परिषद, जालना.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय घनसावंगी, तहसिल कार्यालय अंबड.
- ग्रामपंचायत कार्यालय - तालुका घनसावंगी - मौ. भादली, मौ. गुंज बु. तालूका अंबड- मौ. आलमगांव, मौ. साडेसावंगी.
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद.
- (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन अदयाप पर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ जालना यांचेकडे वाळूघाटाबाबत कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. त्यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथव लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर जाहीर

लोकसूनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे प्रतिनिधी मे. एनवारो टेक्नो कंन्सलट प्रा.लि. नागपूर, श्री. डॉ. प्रशील शूक्ला, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश आहे. आणि पूढे सांगितले की, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण- २०१९/ पी.के.०१/ता.के. ३ दि. ३ डिसेंबर, २०१९ अन्वये ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घ्यावी लागते. जालना जिल्हयातील घनसावंगी तसेच अंबड तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. सदर मायनिंगमध्ये ड्रिलिंग आणि ब्लास्टिंगशिवाय ओपनकास्ट मॅन्युअल पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. केवळ कुदळ, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. टॅक्टर ट्रॉली द्वारे वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. व्यावसायीक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापनासाठी खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

सदर वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**तालुका घनसावंगी-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | भादली | गट क्रं. २९ | ४२५x४५x१.०० | १.९१ | ६५७८ |
| २ | गुंज बु. | गट क्रं. ३६१, ३६२ | ५१०x५०x१.०० | २.५५ | ९०१० |

**तालुका अंबड-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | आलमगांव | गट क्रं. १६६, १६७ | ५५०x२५x०.८० | १.३८ | ३८८७ |
| २ | साडेसावंगी | गट क्रं. ०२, ०३ | ५७५x२५ x०.६० | १.४४ | ३०४८ |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डीग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक यांनी उपस्थितांना आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान जालना जिल्हयातील घनसावंगी व अंबड तालूक्यातील संबंधीत भागातील सार्वजनिक सहभागींनी सदर प्रकल्पासंबंधित काही प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१ **श्री. गोवर्धन दामोदर खरात, सरपंच, भादली, ता. घनसावंगी, जि. जालना** यांनी विचारले की, सदर वाळूघाटाबाबत ग्रामपंचायतमध्ये सभा घेण्यात आली होती त्यासभेत ग्रामस्थांनी सदर वाळू लिलाव न करण्याचा ठराव हा तहसिल कार्यालयात देण्यात आला होता याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. यावर श्री. केशव नेटके, निवासी उपजिल्हाधिकारी जालना यांनी सांगितले की, सदर वाळूघाट बाबत सदर ग्रामपंचायतीने अगोदर होकारार्थी ठराव दिलेला आहे त्यानंतर पून्हा नकारार्थी ठराव सादर केलेला आहे. त्यामूळे ग्रामपंचायतीने पून्हा एकदा ग्रामसभा घ्यावी आणि जो काही निर्णय ग्रामसभेचा असेल तो कळवावा त्यानंतर शासन निर्णय ठरवेल. श्री. डॉ. प्रविण जोशी, सदस्य यांनी नागरिकांना विनंती केली की, सदर जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे आपण पर्यावरण विषयक काही प्रश्न असतील तर मांडावेत. त्यावर पून्हा श्री. गोवर्धन दामोदर खरात यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, सदर वाळूघाटामूळे गावतील रस्ते खराब होतात व वाहनामूळे धूळ निर्माण होते या गावातील नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. त्या अनूषंगाने श्री. डॉ. प्रविण जोशी, सदस्य यांनी सांगितले की, सदर प्रकल्प सादरीकरणामध्ये वाहनाचे तसेच रस्त्याबाबत सविस्तर सादरीकरण झालेले आहे. सदरचा वाळूघाटाचा प्रकल्प हा शासनाच्या ०३/०९/२०१९ च्या धोरणानूसार नियम क्रं. ६९, ७० यामध्ये मोडतो. यामध्ये नियम व अटी सांगण्यात आलेल्या आहेत. त्या नियमाप्रमाणे वाळूघाटावर ट्रॅक्टर या वाहनानेच उत्खनन करण्यात येईल कूठल्याही प्रकारचे जे.सी.बी. अथवा हायवा यासारखे जड वाहनांना परवानगी राहणार नाही. ठेकेदाराला अनूपालन अहवाल देखील सादर करावा लागेल.

२. **श्री. श्रीकांत देठे, सरपंच, साडेसावंगी, ता. अंबड, जि. जालना** यांनी असे विचारले की, सदर वाळूघाट लिलाव होवू नये अशी ग्रामपंचायतीची मागणी आहे तसेच गावात नविनच रस्ता झालेला आहे वाळू वाहतूकीमूळे तो खराब होवू शकतो तसेच वाळू उपसा मूळे पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची श्यकता आहे. यावर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक

यांनी प्रकल्प सल्लागार यांना विनंती केली की, प्रकल्पातील उपाय व योजना बाबत सविस्तर माहिती दयावी. यावर प्रकल्प सल्लागार श्री. प्रशील शूक्ला यांनी सांगितले की, भूजल पातळी तपासूनच वाळू उपसा करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आलेला आहे त्यामूळे पाण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. तसेच रस्त्याच्या प्रश्नावर त्यांनी सांगितले की, नियमाप्रमाणे वाळूघाटावर ट्रॅक्टर या वाहनानेच उत्खनन करण्यात येईल कूठल्याही प्रकारचे जे.सी.बी. अथवा हायवा यासारखे जड वाहनांना परवानगी राहणार नाही. तसेच सदर वाळू ताडपत्रीने झाकण्यात येईल. रोडवर नियमीत पाण्याचे शिंपडण करण्यात येईल त्यामूळे सदर रस्ता खराब होणार नाही याची काळजी घेण्यात आलेली आहे. तसेच जिल्हास्तरीय स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालय यांच्या मार्फत दोन समिती खालीलप्रमाणे स्थापन करण्यात आलेली आहे.

<u>जिल्हास्तरीय समिती</u>

| अ.क्रं. | समितीसदस्याचेनाव | भूमिका/कार्य |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. | पोलीस अधिक्षक | सदस्य |
| ४. | अपर जिल्हाधिकारी | सदस्य |
| ५. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ६. | कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ७. | उप वन सरंक्षक | सदस्य |
| ८. | प्रादेशिक परिवहन अधिकारी | सदस्य |
| ९. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| १०. | वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण यंत्रणा | सदस्य |
| ११. | जिल्हाखनिकर्मअधिकारी | सदस्यसचिव |

<u>तालुकास्तरीय समिती</u>

| अ.क्रं. | समितीसदस्याचेनाव | भूमिका/कार्य |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | उप विभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| २. | उप विभागीय पोलीस अधिकारी | सदस्य |
| ३. | कनिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण यंत्रणा | सदस्य |
| ४. | कनिष्ठ भूवैज्ञानिक भूविज्ञान व खनिकर्म ) (नामनिर्देशीत संचालनालय मार्फत | |
| ५. | गट विकास अधिकारी | सदस्य |
| ६. | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ७. | उप अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ८. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९. | प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १०. | तहसिलदार | सदस्यसचिव |

३. **श्री. श्रीधर सांगळे, साडेसावंगी, ता. अंबड, जि. जालना** यांनी प्रश्न उपस्थित केला की, सदरच्या वाळू लिलावामूळे गावातील रस्ता, पाण्याचा प्रश्न तसेच वाळू वाहतूकीमूळे शेतातील पिकांचे नूकसान होण्याची श्यकता आहे त्यामूळे सदर वाळू लिलाव होवू नये अशी मागणी केली. यावर प्रकल्प सल्लागार श्री. प्रशील शूक्ला यांनी सांगितले की, नियमाप्रमाणे वाळूघाटावर ट्रॅक्टर या वाहनानेच उत्खनन करण्यात येईल कूठल्याही प्रकारचे जे.सी.बी. अथवा हायवा यासारखे जड वाहनांना परवानगी राहणार नाही. रोडच्या दोन्ही बाजूस झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे त्यामूळे धूळ निर्माण होणार नाही तसेच रोडवर नियमीत पाणी शिंपडण्यासाठी टँकर ची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच रस्ते मजबूतीकरण करण्यासाठी सूध्दा उपाययोजना केलेल्या आहेत. जर शासनाच्या नियमाचे उल्लंघन कोणी करत असलेले आढळून आल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यासाठी अगोदर सांगितल्याप्रमाणे जिल्हास्तारीय स्तरावर समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

४. **श्री. बाळासाहेब देठे, साडेसावंगी, ता. अंबड, जि. जालना** यांनी विचारले की, सदर वाळूघाटामूळे गावामध्ये पाण्याचा प्रश्न तसेच शेतक-यांच्या पिकांचे नूकसान होईल यामूळे वाळू लिलाव होवू नये अशी मागणी केली. यावर श्री. डॉ. प्रविण जोशी, सदस्य

यांनी सांगितले की, सदर प्रकल्प सादरीकरणामध्ये आणि अगोदरच्या प्रश्नावर सूध्दा उत्तरे देण्यात आलेली आहे.

५. **श्री. एन. डी. खरात, ग्रामसेवक, साडेसावंगी, ता. अंबड, जि. जालना** यांनी विचारले की, वाळूघाट लिलावासाठी ग्रामपंचायतीने अगोदर होकारार्थी ठराव सादर केली तदनंतर पून्हा नकारार्थी ठराव सादर केलेला आहे. त्यावर श्री. केशव नेटके, निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ग्रामपंचयतीने ग्रामसभा घेवून सदर वाळूघाटाबाबत होकारीर्थी ठराव दिलेला आहे त्यामूळेच सदर वाळूघाट प्रस्तावित केलेला आहे. तरीही ग्रामपंचायतला काही आक्षेप असेल तर त्यांनी शासनास कळवावे त्यावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

६. **श्री. बाबासाहेब त्रिंबक खरात, आलमगाव, ता. अंबड, जि. जालना** यांनी प्रश्न उपस्थित केला की, मागच्या वर्षी वाळूघाटामूळे गावातील नागरिकांना पाण्याचा तूटवडा निर्माण झाला होता. यावर श्री. डॉ. प्रविण जोशी, सदस्य यांनी सांगितले की, सदर वाळूघाट हा नविन प्रकल्प आहे व त्याचा पूर्ण अभ्यास करूनच प्रकल्पाला मान्यता देण्यात आलेली आहे तसेच सदर प्रकल्पाचे सादरीकरणामध्ये उपाय व योजना बाबत माहिती देण्यात आलेली आहे.

श्री. श्री. अंकूष पिनाटे, अप्पर जिल्हाधिकारी यांनी नमूद केले की, सदरचा वाळूघाटाचा लिलावावमध्ये बदल करण्यात आलेला असून वाळूघाट लिलाव एक वर्ष न करता तीन वर्षासाठी करण्यात येणार आहे.

श्री. सो.म. कुरमुडे, आणि श्री. डॉ. प्रविण जोशी यांनी उपस्थितांना सांगितले की, अजुनही कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार

मानले व सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

डॉ.प्र.म.जोशी
(सदस्य)
तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद

केशव नेटके
(अध्यक्ष)
तथा
अति. जिल्हादंडाधिकारी, जालना

सो.म. कुरमुडे
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील जाफ्राबाद तालुक्यातील जवखेडा ठेंग, देउळगांव उगले-निमखेडा, सांवगी, मेरखेडा तसेच भोकरदन तालुक्यातील वालसा डावरगाव, वालसा खालसा१, वालसा खालसा२, जवखेडा ठोंबरी येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २१/१०/२०२१ रोजी सकाळी १०:३० वा. तहसिल कार्यालय जाफ्राबाद, ता. जाफ्राबाद, जि. जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

........................................................................................................

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील जाफ्राबाद तालुक्यातील जवखेडा ठेंग, देउळगांव उगले-निमखेडा, सांवगी, मेरखेडा तसेच भोकरदन तालुक्यातील वालसा डावरगाव, वालसा खालसा१, वालसा खालसा२, जवखेडा ठोंबरी येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २१/१०/२०२१ रोजी सकाळी १०:३० वा. तहसिल कार्यालय जाफ्राबाद, ता. जाफ्राबाद, जि. जालना पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. केशव नेटके**
निवासी उप जिल्हाधिकारी
जालना : अध्यक्ष

२. **श्री. डॉ. प्रविण जोशी**
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, औरंगाबाद : सदस्य

३. **श्री. सो.म. कुरमूडे**
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना : समन्वयक

जालना जिल्हयातील जाफ्राबाद तालुक्यात तसेच भोकरदन तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळुघाटाच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी त्यांचा प्रतिनिधी म्हणून श्री. केशव नेटके, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अति. जिल्हादंडाधिकारी, जालना यांची नियुक्ती करून त्यांच्या अध्यक्षतेखाली सदर सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुचविले. त्या नुसार सदर सुनावणी मा. निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली दि. २१ आक्टोबर २०२१ रोजी सकाळी १०-३० वाजता तहसिल कार्यालय जाफ्राबाद येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, जालना यांचा, जालना जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १५/०९/२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तहसिल कार्यालय जालना येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे. सदर बाबतची जाहीर सुचना दि. १९/०९/२०२१ रोजीच्यो दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना येथे लिखीत स्वरूपात पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
- जिल्हा उदयोग केंद्र, जालना.
- जिल्हा परिषद, जालना.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय जाफ्राबाद, तहसिल कार्यालय भोकरदन.
- ग्रामपंचायत कार्यालय - तालुका जाफ्राबाद- मौ. जवखेडा ठेंग, मौ. देउळगांव उगले-निमखेडा, मौ. सांवगी, मौ. मेरखेडा. तालुका भोकरदन- मौ. वालसा डावरगाव, मौ. वालसा खालसा१, मौ. वालसा खालसा२, मौ. जवखेडा ठोंबरी.
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद.
- (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन अदयाप पर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ जालना यांचेकडे वाळूघाटाबाबत कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. त्यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथव लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर जाहीर

लोकसूनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने, त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे प्रतिनिधी मे. एनवारो टेक्नो कंन्सलट प्रा.लि. नागपूर, श्री. डॉ. प्रशील शूक्ला, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश होता. आणि पूढे सांगितले की, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण- २०१९/ पी.के.०१/ता.के. ३ दि. ३ डिसेंबर, २०१९ अन्वये ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घ्यावी लागते. जालना जिल्हयातील जाफ्राबाद तसेच भोकरदन तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. सदर मायनिंगमध्ये ड्रिलिंग आणि ब्लास्टिंगशिवाय ओपनकास्ट मॅन्युअल पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. केवळ कुदळ, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. टॅक्टर ट्रॉली द्वारे वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. व्यावसायीक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापनासाठी खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

सदर वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**तालुका जाफ्राबाद-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | जवखेडा ठेंग | गट क्रं. १५, १६, ५०, ५१, ८९ | ४१०x२५x०.६० | १.०२५ | २१७३ |
| २ | देउळगाव उगले- निमखेडा | गट क्रं. १६०, १६२, १६३, १७४ | ४५०x२५x०.५० | १.१२५ | १९८८ |
| ३ | सावंगी | गट क्रं. २५५, २५६, २५७, २५८, २५९, २६०, २६१ | ५००x३०x१.०० | १.५० | ५३०० |
| ४ | मेरखेडा | गट क्रं. २६२,२६३, २६४, २६५, २५२, २६१, २६९, २६८, २६६, २६, २८, २९, ३०, ३१, ३२, २६७ | ५००x३०x०.५० | १.५० | २६५० |

**तालुका भोकरदन-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वालसा डावरगांव | गट क्रं. १३२, १३३, १५४, १५५ | ४८०x३०x०.८० | १.४४ | ४०७१ |
| २ | वालसा खालसा१ | गट क्रं. ५०, ५१, ५२, ५४ | ४७५x२२x०.८० | १.०४५ | २९५४ |
| ३ | वालसा खालसा२ | गट क्रं. ६१, ६२, ६३, ६६, ६७ | ४७५x२२x०.५० | १.०४५ | १८४६ |
| ४ | जवखेडा ठोंबरी | गट क्रं. ३१२, ३१३, ३१४, ३२६, ३२७ | ५८७x४०x०.५० | २.३४ | ४१४८ |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक यांनी उपस्थितांना आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान जालना जिल्हयातील जाफ्राबाद व भोकरदन तालूक्यातील संबंधीत भागातील सार्वजनिक सहभागींनी सदर प्रकल्पासंबंधित काही प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१. **श्री. लक्ष्मण रामकिसन ठोंबरे, सरपंच, जवखेडा ठोंबरी, ता. भोकरदन, जि. जालना** यांनी विचारले की, सदर वाळूघाटाचा लिलाव करण्यात यावा अशी मागणी ग्रामपंचायतची आहे, तसेच त्यासाठी ठराव देखील सादर केलेला आहे. परंतू वाळू उत्खनन हे मोठया प्रमाणावर करण्यात येते, जेसीबी व टिप्पर यांचा वापर करण्यात येतो तसेच गावात रात्रीबेरात्री वाहतूक व धूळ निर्माण होत असते. सदर वाळूघाटाचे उत्खनन करत असताना प्रदूषण नियंत्रण मंडळाने जे काही नियम व अटी लागू केलेल्या आहेत त्याचे ठेकेदार, कामगार यांनी तंतोतंत पालण करावे व त्यानूसार वाळू उत्खनन करावी जेणेकरून वाहतूकीमूळे गावातील रस्ते खराब होणार नाहीत व वाहतूकीमूळे उडणारी धूळ ही निर्माण होणार नाही अशी त्यांनी प्रशासनास विनंती केली. तसेच त्यांनी झाडे लावण्याविषयी असे सांगितले की, कंत्राटदार यांच्यामार्फत झाडे न लावता ते ग्रामपंचयात कडून लावावीत जेणेकरून झाडांची संगोपन, देखभाल ही ग्रामपंच्यायत कार्यालयाकडून करता येणे शक्य होईल अशी प्रशासनास विनंती देखील केली, त्या अनूषंगाने श्री. डॉ. प्रविण जोशी, सदस्य यांनी प्रकल्प सल्लागार यांना विनंती केली की, यावर योग्य ते उत्तर देण्यात यावे. यावर प्रकल्प सल्लागार श्री. प्रशील शूक्ला यांनी सांगितले की, सदरचा वाळूघाटाचा प्रकल्प हा शासनाच्या ०३/०९/२०१९ च्या धोरणानूसार नियम क्रं. ६९, ७० यामध्ये मोडतो. यामध्ये नियम व अटी सांगण्यात आलेल्या आहेत. त्या नियमाप्रमाणे वाळूघाटावर ट्रॅक्टर या वाहनानेच उत्खनन करण्यात येईल कूठल्याही प्रकारचे जे.सी.बी. अथवा हायवा यासारखे जड वाहनांना परवानगी राहणार नाही. ठेकेदाराला अनूपालन अहवाल देखील सादर करावा लागेल. जर

शासनाच्या नियमाचे उल्लंघन कोणी करत असलेले आढळून आल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यासाठी जिल्हास्तरीय स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालय यांच्या मार्फत दोन समिती खालीलप्रमाणे स्थापन करण्यात आलेली आहे.

जिल्हास्तरीय समिती

| अ.क्रं. | समितीसदस्याचेनाव | भूमिका/कार्य |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. | पोलीस अधिक्षक | सदस्य |
| ४. | अपर जिल्हाधिकारी | सदस्य |
| ५. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ६. | कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ७. | उप वन सरंक्षक | सदस्य |
| ८. | प्रादेशिक परिवहन अधिकारी | सदस्य |
| ९. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| १०. | वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण यंत्रणा | सदस्य |
| ११. | जिल्हाखनिकर्मअधिकारी | सदस्यसचिव |

तालुकास्तरीय समिती

| अ.क्रं. | समितीसदस्याचेनाव | भूमिका/कार्य |
|---|---|---|
| १. | उप विभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| २. | उप विभागीय पोलीस अधिकारी | सदस्य |
| ३. | कनिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण यंत्रणा | सदस्य |
| ४. | कनिष्ठ भूवैज्ञानिक भूविज्ञान व खनिकर्म ) (संचालनालय मार्फत नामनिर्देशीत | |
| ५. | गट विकास अधिकारी | सदस्य |
| ६. | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७. | उप अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ८. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९. | प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १०. | तहसिलदार | सदस्यसचिव |

तसेच झाडांच्या प्रश्नावर निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीने झाडे लावण्यासाठी जागा निश्चित करून कळवावी यावर चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

२. **श्री. अशोक सिताराम, सरपंच, देउळगाव उगले, ता. जाफ्राबाद, जि. जालना** यांनी असे विचारले की, गावात रस्ते मंजूर करण्यात यावेत जे रस्ते आहेत ते वाळू वाहतूकीच्या वाहनामूळे खराब होत आहे. ठेकेदार यांच्यावर कूठलीही कारवाई होत नाही. तसेच त्यांनी जिल्हा खनिकर्म यांच्या मार्फत मिळणारा शासनाचा निधी अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयाला मिळालेला नाही असा आक्षेप देखील मांडला. यावर श्री. केशव नेटके, निवासी उपजिल्हाधिकारी जालना यांनी सांगितले की, शासन निर्णय दिं. ३०/०९/२०१९ च्या परि. IV नूसार नियमानूसार मिळणारी रक्कम ही सदर ग्रामपंचायत कार्यालयाला देण्यात येईल.

३. **श्री. गणेश गोपी चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य, निमखेडा** यांनी सदर वाळूघाटामध्ये देउळगाव उगले-निमखेडा असा वाळूघाट आहे यामध्ये कूठल्या गावातील वाळूघाट आहे असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की, सदरचा वाळूघाट हा देउळगाव उगले या गावातील आहे. परंतू वाळूघाटाचा शिवारातील शीव लागून असल्यामूळे देउळगाव उगले-निमखेडा असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

श्री. अंकूष पिनाटे, अप्पर जिल्हाधिकारी यांनी नमूद केले की, सदरचा वाळूघाटाचा लिलावावमध्ये बदल करण्यात आलेला असून वाळूघाट लिलाव एक वर्ष न करता तीन वर्षासाठी करण्यात येणार आहे.

श्री. सो.म. कुरमुडे, आणि श्री. डॉ. प्रविण जोशी यांनी उपस्थितांना विचारले की, अजुनही कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**डॉ.प्र.म.जोशी**
(सदस्य)
तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद

**केशव नेटके**
(अध्यक्ष)
तथा
अति. जिल्हादंडाधिकारी, जालना

**सो.म. कुरमुडे**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील जालना तालुक्यातील बढाण बु., गोलापांगरी, पाचनवडगाव, कौठा, घेटुळी, कारला येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २१/१०/२०२१ रोजी दूपारी ०३:३० वा. तहसिल कार्यालय जालना, ता. जि. जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

..........................................................................................................

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील जालना तालुक्यातील बढाण बु., गोलापांगरी, पाचनवडगाव, कौठा, घेटुळी, कारला येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २१/१०/२०२१ रोजी दूपारी ०३:३० वा. तहसिल कार्यालय जालना, ता. जि. जालना पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. केशव नेटके**
निवासी उप जिल्हाधिकारी
जालना : अध्यक्ष

२. **श्री. डॉ. प्रविण जोशी**
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, औरंगाबाद : सदस्य

३. **श्री. सो.म. कुरमूडे**
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना : समन्वयक

जालना जिल्हयातील जालना तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळुघाटाच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी त्यांचा प्रतिनिधी म्हणून श्री. केशव नेटके, निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांची नियुक्ती करून त्यांच्या अध्यक्षतेखाली सदर सुनावणी ची प्रक्रिया पूर्ण करणे साठी सुचविले. त्या नुसार सदर सुनावणी मा. निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली दि. २१ आक्टोबर २०२१ रोजी दूपारी ०३-३० वाजता तहसिल कार्यालय जालना येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, जालना यांचा, जालना जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १५/०९/२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तहसिल कार्यालय जालना येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे. सदर बाबतची जाहीर सुचना दि. १९/०९/२०२१ रोजीच्यो दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना येथे लिखीत स्वरूपात पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
- जिल्हा उदयोग केंद्र, जालना.
- जिल्हा परिषद, जालना.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय जालना.
- ग्रामपंचायत कार्यालय - तालुका जालना – मौ. बढाण बु., मौ. गोलापांगरी, मौ. पाचनवडगाव, मौ. कौठा, मौ. घेटुळी, मौ. कारला.
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद.
- (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन अदयाप पर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ जालना यांचेकडे वाळूघाटाबाबत कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. त्यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथव लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर जाहीर लोकसूनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने, त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे प्रतिनिधी मे. एनवारो टेक्नो कंन्सलट प्रा.लि. नागपूर, श्री. डॉ. प्रशील शूक्ला, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश होता. आणि पूढे सांगितले की, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण- २०१९/ पी.के.०१/ता.के. ३ दि. ३ डिसेंबर, २०१९ अन्वये ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घ्यावी लागते. जालना जिल्हयातील जाफ्राबाद तसेच भोकरदन तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. सदर मायनिंगमध्ये ड्रिलिंग आणि ब्लास्टिंगशिवाय ओपनकास्ट मॅन्युअल पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. केवळ कुदळ, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. टॅक्टर ट्रॉली द्वारे वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. व्यावसायीक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापनासाठी खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

सदर वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**तालुका जालना-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बढाण बु. | गट क्रं. १६७, १६६, १६५, १६४, १६२, १६१ | ७००x२०x०.५० | १.४० | २४७३ |
| २ | गोलापांगरी | गट क्रं. १३९, १४०, १११, ११२ | ६००x२०x०.४० | १.२० | १६९६ |
| ३ | पाचनवडगाव | गट क्रं. ४७४, ३९, २७२, २७१, २७०, २६९, २५८ | १४००x२०x०.५० | २.८० | ४९४७ |
| ४ | कौठा | गट क्रं. ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४८ | १०००x२२x०.८० | २.२० | ६२१९ |
| ५ | घेटुळी | गट क्रं. ५३, ५२, ४७, ४५, ४४, ४१, ३९ | ५२०x२७.५०x०.८० | १.४३ | ४०४२ |
| ६ | कारला | गट क्रं. गायरान (०६), ८६, ८७ | ९००x२५x०.४० | २.२५ | ३१८० |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक यांनी उपस्थितांना आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान जालना जिल्हयातील जाफ्राबाद व भोकरदन तालूक्यातील संबंधीत भागातील सार्वजनिक सहभागींनी सदर प्रकल्पासंबंधित काही प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१. **श्री. ज्ञानेश्वर कुंडलिक देवरे, सरपंच, बढाण बु., ता. जि. जालना** यांनी प्रश्न उपस्थित केला की, सदर वाळूघाटाचा वाळू उत्खनन लिलाव झाला तर त्याचा ग्रामपंचायतला काही फायदा होणार आहे का. यावर श्री. केशव नेटके, निवासी

उपजिल्हाधिकारी यांनी सांगितले की, वाळू घाटाचा लिलाव झाल्यानंतर जी काही रक्कम मिळेल त्यातील २५ टक्के रक्कम ही सदर ग्रामपंचायत कार्यालयाला अदा करण्यात येईल याचा निश्चितच ग्रामपंचायतला फायदा होईल.

२. **श्री. अनिल पूरी, मंडळ अधिकारी, जालना** यांनी प्रश्न उपस्थित केला की, सदर वाळू वाहतूकीमूळे आजूबाजूच्या शेतातील पिकांचे नूकसान होईल का तसेच नूकसान झाल्यास त्यावर काही उपाययोजना आहेत का किंवा नूकसान झाल्यास शेतक-यांना काही मदत देता येईल का. त्याअनूषंगाने श्री. डॉ. प्रविण जोशी, सदस्य यांनी प्रकल्प सल्लागार यांना विनंती केली की यावर सविस्तर प्रकल्प उपाययोजना बाबत माहिती देण्यात यावी. यावर प्रकल्प सल्लागार श्री. प्रशील शूक्ला यांनी सांगितले की, सदर प्रस्तावित वाळूघाट पर्यावरण व्यवस्थापन योजने मध्ये वायू प्रदूषण नियंत्रण उपाययोजना याबाबत खालील तक्त्याप्रमाणे माहिती दिली -

| अ.क्र. | प्रदूषणाचे स्त्रोत | अपेक्षित परिणाम | व्यवस्थापन योजना |
|---|---|---|---|
| १. | ट्रान्सपोर्ट रोड/रेती वाहन मार्ग | हवा गुणवत्ता/जमीन<br>रस्ता मजबूती<br>रस्त्याचा —हास | • वाहन मार्गाचे मजबूती करण<br>• वाहन मार्गाची देखभाल<br>• ट्रॅक्टर मध्ये मान्यताप्राप्त क्षमतेनुसार खनिज वाहन<br>• उत्खनन कालावधी दरम्यान हवा दर्जा तपासणी |
| २. | ट्रक/ट्रॅक्टर यांचे चलन | हवा दर्जा/गुणवत्ता | • मान्यता प्राप्त क्षमतेपेक्षा ट्रॅक्टर मध्ये खनिज न भरणे<br>• रेती वाहन करणा-या ट्रॅक्टर ट्रॉलीज टारपोलीन ने वाहन दरम्यान झाकणे<br>• वाहनांना गती नियंत्रक बसविणे<br>• रेती घाटावर रेती ट्रॅक्टर मध्ये भरताना इंजिन बंद ठेवणे |
| ३. | रेतीघाट व रेतीघाट मार्ग | उत्खनन प्रक्रिया | • रेतीघाट होलेज मार्गाची वारंवार दुरूस्ती व देखभाल<br>• कामगारांना डस्टा मास्क देणे<br>• रेती उत्खानन व वाहन दिवसाच करणे |
| ४. | नदी किना-याचे व्यवस्थापन | नदी किना-याची झीज<br>पूर रेषा व्यवस्थापन | • नदी किना-यावर झाडे लावणे<br>• नदी किना-याच्या उतारावर हिरवळ (ग्रास) लावणे |

सदरच्या तक्त्याप्रामाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. यामूळे वाहनांमूळे होणारी धूळ ही फार कमी प्रामाणात होईल व त्यामूळे जवळच्या शेतातील पिकांचे नूकसान होणार नाही. तसेच सांगितले की, नियमाप्रमाणे वाळूघाटावर ट्रॅक्टर या वाहनानेच उत्खनन करण्यात येईल कूठल्याही प्रकारचे जे.सी.बी. अथवा हायवा यासारखे जड वाहनांना परवानगी राहणार नाही. ठेकेदाराला अनूपालन अहवाल देखील सादर करावा लागेल. जर शासनाच्या नियमाचे उल्लंघन कोणी करत असलेले आढळून आल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यासाठी जिल्हास्तरीय स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालय यांच्या मार्फत दोन समिती खालीलप्रमाणे स्थापन करण्यात आलेली आहे.

जिल्हास्तरीय समिती

| अ.क्रं. | समितीसदस्याचेनाव | भूमिका/कार्य |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. | पोलीस अधिक्षक | सदस्य |
| ४. | अपर जिल्हाधिकारी | सदस्य |
| ५. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ६. | कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ७. | उप वन सरंक्षक | सदस्य |
| ८. | प्रादेशिक परिवहन अधिकारी | सदस्य |
| ९. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| १०. | वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण यंत्रणा | सदस्य |
| ११. | जिल्हाखनिकर्मअधिकारी | सदस्यसचिव |

तालुकास्तरीय समिती

| अ.क्रं. | समितीसदस्याचेनाव | भूमिका/कार्य |
|---|---|---|
| १. | उप विभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| २. | उप विभागीय पोलीस अधिकारी | सदस्य |
| ३. | कनिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण यंत्रणा | सदस्य |
| ४. | कनिष्ठ भूवैज्ञानिक भूविज्ञान व खनिकर्म) (संचालनालय मार्फत नामनिर्देशीत | |
| ५. | गट विकास अधिकारी | सदस्य |
| ६. | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ७. | उप अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ८. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९. | प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १०. | तहसिलदार | सदस्यसचिव |

श्री. अंकूष पिनाटे, अप्पर जिल्हाधिकारी यांनी नमूद केले की, सदरचा वाळूघाटाचा लिलावावमध्ये बदल करण्यात आलेला असून वाळूघाट लिलाव एक वर्ष न करता तीन वर्षासाठी करण्यात येणार आहे.

श्री. सो.म. कुरमुडे यांनी उपस्थितांना सांगितले की, अजुनही कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

डॉ.प्र.म.जोशी
(सदस्य)
तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद

केशव नेटके
(अध्यक्ष)
तथा
अति. जिल्हादंडाधिकारी, जालना

सो.म. कुरमुडे
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील मंठा तालूक्यातील किर्ला-टाकळखोपा, किर्ला-वाघाळा, वाघाळा-भूवन, कानडी-उस्वद तसेच परतूर तालूक्यातील डोल्हारा-बाबुलतारा, गोळेगांव वाळूघाट येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २२/१०/२०२१ रोजी दूपारी ०३:३० वा. तहसिल कार्यालय मंठा, ता. मंठा, जि. जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

.................................................................................................................................

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या जालना जिल्हयातील मंठा तालूक्यातील किर्ला-टाकळखोपा, किर्ला-वाघाळा, वाघाळा-भूवन, कानडी-उस्वद तसेच परतूर तालूक्यातील डोल्हारा-बाबुलतारा, गोळेगांव वाळूघाट येथील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २२/१०/२०२१ रोजी दूपारी ०३:३० वा. तहसिल कार्यालय मंठा, ता. मंठा, जि. जालना पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. केशव नेटके**
निवासी उप जिल्हाधिकारी
जालना : अध्यक्ष

२. **श्री. डॉ. प्रविण जोशी**
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, औरंगाबाद : सदस्य

३. **श्री. सो.म. कुरमूडे**
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना : समन्वयक

जालना जिल्हयातील मंठा तालुक्यात तसेच परतूर तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळुघाटाच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी त्यांचा प्रतिनिधी म्हणून श्री. केशव नेटके, निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांची नियुक्ती करून त्यांच्या अध्यक्षतेखाली सदर सुनावणी ची प्रक्रिया पूर्ण करणे साठी सुचविले. त्या नुसार सदर सुनावणी मा. निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली दि. २२ आक्टोबर २०२१ रोजी दूपारी ०३-३० वाजता तहसिल कार्यालय मंठा येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, जालना यांचा, जालना जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १५/०९/२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तहसिल कार्यालय जालना येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे. सदर बाबतची जाहीर सुचना दि. १९/०९/२०२१ रोजीच्यो दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना येथे लिखीत स्वरूपात पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
- जिल्हा उदयोग केंद्र, जालना.
- जिल्हा परिषद, जालना.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय मंठा, तहसिल कार्यालय परतूर.
- ग्रामपंचायत कार्यालय - तालुका मंठा – मौ. किर्ला-टाकळखोपा, मौ. किर्ला-वाघाळा, मौ. वाघाळा-भूवन, मौ. कानडी-उस्वद, तालुका परतूर- मौ. डोल्हारा-बाबुलतारा, मौ. गोळेगांव.
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद.
- (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन अदयाप पर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ जालना यांचेकडे वाळूघाटाबाबत कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. त्यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथव लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर जाहीर

लोकसूनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने, त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे प्रतिनिधी मे. एनवारो टेक्नो कंन्सलट प्रा.लि. नागपूर, श्री. डॉ. प्रशील शूक्ला, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश आहे. आणि पूढे सांगितले की, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण- २०१९/ पी.के.०१/ता.के. ३ दि. ३ डिसेंबर, २०१९ अन्वये ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घ्यावी लागते. जालना जिल्हयातील जाफ्राबाद तसेच भोकरदन तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. सदर मायनिंगमध्ये ड्रिलिंग आणि ब्लास्टिंगशिवाय ओपनकास्ट मॅन्युअल पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. केवळ कुदळ, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. टॅक्टर ट्रॉली द्वारे वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. व्यावसायीक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापनासाठी खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

सदर वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**तालुका मंठा-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | किर्ला-टाकळखोपा | किर्ला- गट क्रं. ४०, ४१, ४२, ४३, ४७, ४८, ५०, ५१.<br>टाकळखोपा- गट क्रं. ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४६, ४७, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९६, ९७, १०२. | ६५०x५०x१.०० | ३.२५ | ११४८४ |
| २ | किर्ला-वाघाळा | किर्ला- गट क्रं. १५१, १५२.<br>वाघाळा- गट क्रं. ८५, १०६, १३६, १३७. | ५००x६०x१.०० | ३.०० | १०६०१ |
| ३ | वाघाळा-भूवन | वाघाळा- गट क्रं. २१८, २११, २१०, २०९, २०८, १८०, १७९, १७८.<br>भूवन- गट क्रं. ०२, ०३, ०४, ०५, ०६, ०७, ०८, ०९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९. | ५००x५०x१.०० | २.५० | ८८३४ |
| ४ | कानडी-उस्वद | कानडी- गट क्रं. २५५, २५६, २५७, २५८, २६१, २६३, २६४.<br>उस्वद- गट क्रं. ३२९, ३३०, ३५३, ३५५, ३५६, ३७३. | ४००x५०x१.०० | २.०० | ७०६७ |

**तालुका परतूर-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | डोल्हारा-बाबुलतारा | डोल्हारा- गट क्रं. ५४, ५५, ५९, | ७००x७०x०.८० | ४.९० | १३८५१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ६०, ६१, ७२, ७३, ७४, ७५. बाबुलतारा- गट क्रं. ३४९, ३५१, ३५२, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०. | | | |
| २ | गोळेगांव | गट क्रं. ३३९, ३३८, ३३७, ३३६, ३३५. | ५००x६० x१.०० | ३.०० | १०६०० |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डीग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक यांनी उपस्थितांना आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान जालना जिल्हयातील मंठा व परतूर तालूक्यातील संबंधीत भागातील सार्वजनिक सहभागींनी सदर प्रकल्पासंबंधित काही प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१. **श्री. शंकर बांडगे, उपसरपंच, किर्ला, ता. मंठा, जि. जालना** यांनी प्रश्न उपस्थित केली की, सदर वाळूघाटाचा लिलावामध्ये ठेकेदार कोण असतील. यावर श्री. डॉ. प्रविण जोशी, सदस्य यांनी सांगितले की, सदर जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे पर्यावरणाविषयी आपले काही प्रश्न असतील तर विचारावेत. तदनंतर यावर श्री. केशव नेटके, निवासी उपजिल्हाधिकारी जालना यांनी सांगितले की, सदर वाळूघाटाचा सर्वे झालेला आहे. ठेकेदार यांची नेमनूक करताना सदर ग्रामपंचयतीला कळविण्यात येईल.

२. **श्री. सतीश चिथळे, सरपंच, डोल्हारा, ता. परतूर, जि. जालना** यांनी विचारले की, मागील वर्षी वाळूघाट लिलाव झाला नव्हता यावर्षी सदर वाळूघाट लिलाव शासनाच्या नियम व अटीनूसार करण्यात यावा अशी विनंती केली. यावर श्री. केशव नेटके, निवासी उपजिल्हाधिकारी जालना यांनी सांगितले की, सदर वाळूघाट लिलाव करण्यासाठीच आपण पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेत आहोत.

३. **श्री. सतीश महादेव खंदारे, कानडी, ता. मंठा, जि. जालना** यांनी सांगितले की, सदर वाळू लिलाव ठेकेदार वाळूच्या वाहतीकूळे गावातील रस्ते खराब होतात व ते दूरुस्तीसूध्दा करून देत नाहीत त्यामूळे गावातील रस्त्यासांठी उपाययोजना करून देण्यात यावी ही नम्र विनंती. यावर श्री. केशव नेटके, निवासी उपजिल्हाधिकारी जालना यांनी सांगितले की, वाळूघाट लिलाव झाल्यानंतर रस्ते दुरूस्ती करण्यासाठी सदर ग्रामपंचायतला पैसे देण्यात येतील तसेच तोपर्यंत कच्चा मूरूम रस्ता बांधण्यात येईल.

श्री. अंकूष पिनाटे, अप्पर जिल्हाधिकारी यांनी नमूद केले की, सदरचा वाळूघाटाचा लिलावावमध्ये बदल करण्यात आलेला असून वाळूघाट लिलाव एक वर्ष न करता तीन वर्षासाठी करण्यात येणार आहे.

श्री. सो.म. कुरमुडे, आणि श्री. डॉ. प्रविण जोशी यांनी उपस्थितांना सांगितले की, अजुनही कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

डॉ.प्र.म.जोशी
(सदस्य)
तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद

केशव नेटके
(अध्यक्ष)
तथा
अति. जिल्हादंडाधिकारी, जालना

सो.म. कुरमुडे
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद